# ५. मुस्लिम जातींच्या व्यक्तींना द्यावयाच्या जाती प्रमाणपत्राबाबत

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : सीबीसी १०९५ / प्र. क्र. २२६ / मावक - ५
समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ ऑक्टोबर १९९५

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हा दंडाधिकारी

विषय : मंडल आयेगाच्या शिफारशींची अंमलबजावणी...
जाती प्रमाणपत्र देण्याबाबतच्या अडचणी

१. जातीचे प्रमाणपत्र देताना कोणत्या गोष्टी विचारात घ्यावयाच्या याची यादी शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी १०७७ / ५०८७३ / डी-५ दि. २३-३-७९ सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद केलेल्या आहेत. दि. ९-८-९५ च्या शासन निर्णयान्वये काही मुस्लिम जातीचा समावेश इतर मागास वर्गात केलेला आहे. या जातीच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र देताना मागासलेल्या जातीचा दावा करणाऱ्या व्यक्तींच्या सर्वसाधारण रहिवास / सध्या राहत असलेल्या ठिकाणी त्यांच्या जातीबाबत गृहचौकशी करावी. तसेच तेथील तलाठी / सरपंच यांच्याकडून त्या व्यक्तीच्या जातीबाबत दाखला घेण्यात यावा. संबंधित व्यक्तीचे त्यांच्या जातीबाबत प्रतिज्ञापत्र घ्यावे, या चौकशी अहवालाच्या, तलाठी, सरपंच यांनी दिलेल्या जाती दाखल्याच्या तसेच प्रतिज्ञापत्राच्या आधारे तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी जाती दाव्याबाबत निर्णय घेऊन त्यांची खात्री पटल्यास संबंधित व्यक्तींना जाती प्रमाणपत्र देण्यात यावे सोबत काही मुस्लिम जातींची माहिती जोडली आहे. तीही विचारात घ्यावी. हे सर्व विचारात घेऊन जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. सदरहू सूचना मुस्लिम जातींच्या व्यक्तींना द्यावयाच्या जातीप्रमाणपत्राबाबतच्या संदर्भातच आहे.

२. सदरच्या सूचना सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत.

(रा. नु. गावीत)
कक्ष अधिकारी

शासन पत्र समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्र. सीबीसी १०९५ / प्र. क्र. २६६ / मावक - ५ दि. १९ / १० / ९५ चे सहपत्र

# मुस्लिम जातींची माहिती

१. **बागवान** : बागवान याचा अर्थ माळी व्यवसाय करणारे मुस्लिम धर्मिय व्यक्ती आहेत. या जातींच्या व्यक्तींना जात प्रमाणपत्र देताना त्यांचे पूर्वज माळी व्यवसाय करीत होत काय, याबाबत माहिती घ्यावी.

२. **जुलाहा : (मोमिन)** म्हणजे विणकर (कापड विणणारे) मुस्लिम धर्मिय आहेत. जुलाहाच्या तत्सम जाती म्हणून कोळी जुलाह, चर्मा जुलाह, मोची जुलाह, रामदासी जुलाह आहेत. त्यांचे विवाह मुस्लिम धर्मियांप्रमाणेच होतात. त्यांच्यात बुरखा पद्धत प्रचलित नाही.

३. **अन्सारी** : ही जात देखील जुलाह मोमिन जाती प्रमाणेच विणकर व्यवसाय करणारी आहे.

४. **पिंजारा, पिंजारी, मन्सूरी, नदाफ** : या जाती इस्लाम धर्मीय मुस्लीम समाजातील कापूस पिंजणारी, गाद्या बनविणारी तसेच कारखान्यातून काम क्रणारी व खेड्यापाड्यातून भटकंती क्रणारी व्यावसायिक जात आहे.

५. **फकीर बंदरवाले (माकडवाले)** : माकडाचे खेळ दाखवून स्वतःचा उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांना फकीर बंदरवाले (माकडवाले) म्हणून ओळखतात.

६. **तांबोळी** : विड्याच्या पानांची विक्री करुन स्वतःचा उदरनिर्वाह करतात.

७. **अत्तार** : हळद, कुंकू, मेंदि इत्यादी इत्यादी व्यवसाय करणाऱ्या लोकांना अत्तार म्हणतात.